# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

---

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/ १३/२०१४-१५/१२१ दिनांक : ३१.७.२०१४

**<u>आदेश केस क्र.१३/१४-१५</u>**

| | |
|---|---|
| बाळासो गणपती संकपाळ,<br>मु.पो.कसबा वाळवे, ता.राधानगरी,<br>जि.कोल्हापूर. | अर्जदार |
| **विरुध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर. | |
| २) कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, ग्रामीण-२,कोल्हापूर. | विरुध्द पक्षकार |
| ३) उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभागीय कार्यालय, राधानगरी. | |

**कोरमः-** १. श्री.बी.जी.पवार,अध्यक्ष
२. श्री.जी.बी.पानकर, सदस्य सचिव
३. श्री.जी.सी.लेले,सदस्य

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**
**(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)**
**विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार**

**<u>न्याय निर्णय</u>**

श्री.बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री.बाळासो गणपती संकपाळ,मु.पो.कसबा वाळवे,ता.राधानगरी, यांनी वितरण कंपनी विभागीय कार्यालय,ग्रामीण-२ कोल्हापूर, यांचेविरुध्द मंचाकडे दि.३.६.२०१४ रोजी तक्रार दाखल केली. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अर्जदार यांनी वितरण कंपनीच्या उपविभागाकडे दि.१८.०७.२०१३ रोजी नवीन कनेक्शनसाठी अर्ज दिला. दि.२८.१२.२०१३ रोजी अंतर्गत कक्ष, कोल्हापूर येथे क्ष फॉर्ममध्ये तक्रार केली. दि.२७.०१.२०१४ रोजी मंजुरी मिळाली. त्यानुसार चलन भरले. अंतर्गत कक्षाने SOP प्रमाणे भरपाईचे आदेश न केलेने हे अपील दाखल केले. तसेच वीजजोडणीबाबत स्पष्ट आदेश नाहीत. वीजजोडणी मिळावी.

वितरण कंपनीने दिलेल्या नोटीशीनुसार दि.२४.०६.२०१४ रोजी अहवाल दिला. सदर वीजजोडणी करण्यासाठी १०० KVA व ०.१२ कि.मी.लघुदाब वाहिनी उभा करणे गरजेचे आहे. त्यासाठी अंदाजे खर्च रु.२,७२,५३०/- इतका आहे. ०६.०९.२०१३ रोजी उपविभागीय कार्यालयाकडे अहवाल पाठवला आहे. SPA योजनेचे फंड संपलेने शेतीपंपाना मंजुरी देण्याचे काम स्थगित करण्यात आले होते. माहे जानेवारी,१४ मध्ये नवीन INFRA -२ योजनेची मंजुरी सुरु झाल्यानंतर तक्रारदाराच्या वीजजोडणीस दि.२७.०१.२०१४ रोजी मंजुरी देण्यातआली. माहे मार्च,२०१२ नंतर रक्कम भरलेल्या अर्जदारांना जेष्ठतायादीनुसार वीज जोडणीचे काम सुरु आहे. ग्राहकाला त्याच्या जेष्ठतायादीनुसार वीजजोडणी देण्यात येईल. हेतुपुरस्तर अथवा निष्काळजीपणामुळे विलंब झालेला नाही. भरपाई मंजुर करु नये अशी मागणी केली.

प्रस्तुत तक्रारीची सुनावणी मंचासमोर दि.१६.०७.२०१४ रोजी घेण्यात आली. तक्रारदारातर्फे त्यांचा मुलगा प्रताप उपस्थित होते. वितरण कंपनीतर्फे सहाय्यक अभियंता श्री.तीरमारे व श्री.आरळी उपस्थित होते. तक्रारदार यांनी अर्ज केल्यानंतर व मंजुरीनंतर पैसे चलनाने भरले आहेत. अंतर्गत कक्षाने भरपाईचा आदेश दिला नाही. कृतीमानंकानुसार वीजजोडणी मिळावी व भरपाई मिळावी. तक्रारदार श्री.प्रताप यांनी ठराविक मुदतीत वीजजोडणी दिल्यास विलंबापोटी भरपाई मागणार नाही असे मंचास सांगितले. वितरण कंपनीच्या स्थानिक अधिका-यांस वीजजोडणीची feasibility व Transformer लागतो का ते तपासून पाहण्यास सांगितले.

खालील मुद्दा न्यायनिर्णयासाठी मंचाकडे  उपस्थित होतो.

**मुद्दा क्र.१:**तक्रारदार यांनी मागणी केलेप्रमाणे त्याना वीजजोडणीचा आदेश देणे योग्य होईल काय ?

**उत्तर :** होय.

पुरवठा अधिनियम २००५ मधील सबरुल ४.४ प्रमाणे जेष्ठता यादीनुसार ग्राहकास शेतीपंपासाठी वीजपुरवठा करुन तसा अहवाल मंचास द्यावा.

## कारणमिमांसा

उभय बाजुच्या कथनानुसार ग्राहकाने वितरण कंपनीकडे दि.१८.७.२०१३ रोजी अर्ज केला. अंतर्गत कक्षाकडे तक्रार केली. दि.२७.१.२०१४ रोजी मंजुरी मिळाली. त्यानुसार ग्राहकाने चलन भरले. कृतीमानंकातील अधिनियमांनुसार एल.टी.लाईनची तीन महिन्यात वीजजोडणी व १ महिन्यात सर्व्हे करुन चलन देणे वितरण कंपनीची जबाबदारी आहे. याठिकाणी मंजुरीनुसार T/C लागतो. त्यामुळे वितरण कंपनीकडे १ वर्षाचा वीजजोडणीसाठी कालावधी आहे. असे असल्यामुळे ग्राहकाची वीजजोडणीसाठी झालेल्या विलंबापोटी भरपाईची मागणी या ठिकाणी विचारात घेता येणार नाही. हे खरे की सर्व्हे करुन मंजुरी देण्यास निश्चितपणे विलंब झाला आहे. वितरण कंपनीच्या अधिका-यांनी मंचासमोर सांगितलेले कारण म्हणजे केवळ दोनच अर्जदार आहेत म्हणून estimate करण्यास विलंब झाला. त्यामुळे कृतीमानकेनुसार विलंबापोटी  भरपाई क्षम्य किंवा माफ होणार नाही. चलन देण्यास झालेल्या विलंबापोटी ग्राहक भरपाईसाठी हक्कदार आहे. वितरण कंपनीची ती जबाबदारी आहे. वितरण कंपनीच्या अधिका-यांनी मंचासमोर ग्राहकाचा जेष्ठतायादी क्रमांक  ५०७ आहे त्यामुळे जेष्ठतायादीनुसार वीजपुरवठा देण्यात येईल असे सांगितले. मंचाने वितरण कंपनीच्या अधिका-यांना सध्या available असलेल्या लाईनवरुन फक्त सर्व्हिस लाईनने वीजपुरवठा देता येईल का याचा अहवाल देण्यास सांगितले. असा अहवाल अद्याप दिला नाही. मंजुरीनुसार सदर वीजजोडणीच्या कामास T/C लागतो व एल.टी. ०.१२ कि.मी.चे लाईन उभारणीची आवश्यकता आहे. त्यामुळे वीजजोडणी विलंबापोटी ग्राहकाची भरपाईची मागणी pre-mature होती असे मंचाचे मत आहे. एक वर्षाच्या मुदतीनंतर वीजजोडणीस विलंब झाल्यास ग्राहक स्वतंत्ररित्या भरपाई मागु शकतो असे नमुद करण्यात येत आहे. वितरण कंपनीने अंदाजपत्रकाच्या मंजुरीनुसार  पुरवठा अधिनियम २००५ सबरुल ४.४ नुसार जेष्ठतायादीप्रमाणे ग्राहकाला वीजपुरवठा करण्याचे आदेश देण्यात येत आहे. त्यामुळे मुद्दा क्र.१ चे उत्तर **होय** असे देण्यात येते.

# आदेश

१. तक्रार मंजुर करण्यात येत आहे.

२. वितरण कंपनीने ग्राहकास चलन देण्यास झालेल्या विलंबापोटी कृतीमानंकातील तरतुदीनुसार प्रति आठवडा रु.१००/- भरपाई द्यावी. वितरण कंपनीने ग्राहकास जेष्ठतायादीनुसार पुरवठा अधिनियम २००५ मधील सबरुल ४.४ नुसार शेतीपंपास वीजपुरवठा करावा व तसा अहवाल मंचास द्यावा. वीजजोडणीस झालेल्या विलंबापोटी ग्राहक स्वतंत्ररित्या वीजजोडणी झालेनंतर भरपाई वितरण कंपनीकडे मागु शकतो.

३. सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४. या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

सही/-
(बी.जी.पवार)
अध्यक्ष

श्री.जी.बी.पानकर, सदस्य सचिव .. सही/-

श्री.जी.सी.लेले, ग्राहक सदस्य .. सही/-

एकमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.